# पतसंस्थांची एन.पी.ए. तरतूद ३१/ ३/ २००६ पासून लागू

**म**हाराष्ट्र राज्यातील सर्व नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था व पगारदार सहकारी पतसंस्था यांना ३१/३/२००५ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षापासून लागू करण्यात आलेली एन.पी.ए.ची तरतूद रद्द करूनही एन.पी.ए. ची तरतूद ३१/३/२००६ पासून सुरू होणार आहे. व तशा प्रकारचे परिपत्रक महाराष्ट्र राज्याचे सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि. ९/०५/२००५ रोजी त्यांचे जा.क्र. ना.बँक डी/ ४/पतसंस्था /एन.पी.ए./२००५ अन्वये प्रसिध्द केलेले आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लिमिटेड, मुंबई यांनी या प्रकरणी महाराष्ट्र राज्य सरकार व संबंधीत अधिकारी तसेच मा. सहकार आयुक्त व त्यांचे संलग्न अधिकारी यांचेशी थेट पत्र व्यवहार व प्रत्यक्ष चर्चेद्वारे पतसंस्थांना लागू करण्यात आलेल्या एन.पी.ए. च्या तरतूदीच्या कालावधीबद्दल चर्चा घडवून आणली व शेवटी महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार डॉ. पतंगराव कदम व संबंधीतांनी या प्रकरणी राज्याच्या सहकार आयुक्तांना पतसंस्थांना लागू करावयाच्या एन.पी.ए. ची ३१/३/२००५ ऐवजीची तारीख ३१/३/२००६ रोजी बदलण्यासाठी आदेश दिले.याबद्दल राज्यातील सर्व पतसंस्थांच्या वतीने संबंधीतांचे जाहीर आभार.

दिनांक १०/११/२००४ व दि. २१/१२/२००४ तसेच सध्याचे ९/०५/२००५ चे तिन्ही परिपत्रके वाचल्यानंतर आपल्या लक्षात येईल की, पतसंस्थांना लागू होणारी एन.पी.ए. ची तरतूद आता दि. ३१/३/२००६ रोजी संपणाऱ्या वर्षापासून लागू होणार आहे. **''म्हणजेच पतसंस्थांसाठी एन.पी.ए. ची तरतूद ''ही संकल्पना पतसंस्थांना खुल्या अर्थव्यवस्थेमध्ये खऱ्या अर्थाने फायदेशीरच होणार आहे.** देशातील बँकींग व्यवसाय करणाऱ्या राष्ट्रीयकृत बँका, नागरी सहकारी बँका,जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व राज्य सहकारी बँका यांचेवर भारतीय रिझर्व बँकेच्या विविध निर्बंधामुळे ठेवीदारांच्या रक्कमांची सुरक्षितता व भागदारकांचे हीत प्रत्यक्ष कृतीने जोपसण्याची गरज तयार झालेली आहे. सहकारी बँकींगमध्ये दोन प्रकारचे निर्बंध लागू आहेत. सहकार कायद्याप्रमाणे व भारतीय रिझर्व बँकेच्या नियंत्रणाने बँकांना आपले कामकाज करावे लागत आहे. आपल्या पतसंस्थांना केवळ सहकार कायद्याप्रमाणे सहकार खात्याचे नियंत्रण आहे. आणि अशा परिस्थितीत पतसंस्थांना आपल्या कामकाजात आपले नैपुण्य दाखविण्याची खरी संधी या एन.पी.ए. च्या तरतूदीमुळे आणखी मिळणार आहे. आणि म्हणून पतसंस्थांना ही एन.पी.ए. ची संकल्पना व तिचे परिणाम हे सभासद, ठेवीदार व सहकार चळवळीच्या दृष्टीने निश्चितपणे हितकारक ठरणार आहे, याच्याशी १०० टक्के एकमत होत आहे, याबद्दल आपणा सर्वांना आनंदच होत आहे.३१ मार्च २००५ ही तारीख उलटल्यानंतर पतसंस्थांचे लेखापरिक्षण करण्याचे काम पतसंस्थांमध्ये आता चालू होणार आहे. ज्या पतसंस्थांमध्ये लेखापरिक्षण अद्याप चालू झालेले नाही, त्यांना एन.पी.ए. तरतूद ही या वर्षासाठी करावी लागणार नाही, शिवाय ज्या पतसंस्थांचे लेखापरिक्षण चालू झालेले आहे.त्यांना सुध्दा यावर्षी एन.पी.ए. तरतूद

करावी लागणारी नाही. तसेच ज्या पतसंस्थांचे लेखापरिक्षण पुर्ण झालेले आहे. त्यांनी एन.पी.ए.च्या तरतूदीच्या संदर्भातील ९/०५/२००५ चे परिपत्रक संबंधीत लेखापरिक्षकास सादर करून केलेल्या लेखापरिक्षणाच्या वर्गवारीचा फायदा मिळू शकेल. आणि म्हणून लेखापरिक्षणाच्या बाबतीत ज्या ज्या शंका वा समस्या पतसंस्थांना येत असतील त्या संदर्भात मदत करणेसाठी व मार्ग दाखविण्यासाठी आपण जरूर आमच्याशी संपर्क करावा असे या निमित्ताने आवाहन करण्यात येत आहे.

राज्यातील सर्व पतसंस्थांमध्ये काम करणारे संचालक, अधिकारी व कर्मचारी यांनी एन.पी.ए. व इतर गोष्टींसाठी १०० टक्के प्रशिक्षण घेण्याची नितांत गरज आहे. एवढेच नव्हे तर संबंधीतांनी पतसंस्थांचे आदर्श पोटनियम १०० टक्के ज्ञात करून घेणे आवश्यक आहे. आणि ह्यासाठी राज्यस्तरावर शिक्षण, प्रशिक्षण, प्रचार व प्रसार याचे गेली ८७ वर्षे काम करत असलेल्या ''**महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे**'' हे काम मोठ्या गतीमान पध्दतीने चालू आहे. प्रचंड प्रतिसादाने हे काम आणखी वेगाने होत आहे. या वर्षाच्या शिल्लक १०महिन्यांमध्ये पतसंस्थांमधील १०० टक्के संचालकांनी व महाराष्ट्र सहकारी संघाने या पतसंस्थांमध्ये काम करणारे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ह्याकामी प्रशिक्षण घेण्यासाठी एक योजना तयार केलेली आहे.यासाठी आपण सर्वांनी या राज्याच्या अर्थव्यवस्थेला व विविध संकटांना तोंड देण्यासाठी पतसंस्थांच्या माध्यमातून मोठ्या धाडसाने पुढे येण्याची गरज आहे. व हे अत्यंत महत्त्वाचे काम आपण करावे,आपण कुठल्याही स्तरावरील अडचणीतून मार्ग काढण्यासाठी '**पतसंस्था परिवार**' व सहकार चळवळीतला कार्यकर्ता म्हणून मी आपल्या मदतीसाठी सदैव नियमितपणे उपलब्ध आहे.

पतसंस्था ह्या सभासदांच्या माध्यमातून कार्यकर्त्यांनी उभ्या केलेल्या सहकारी संस्था असल्यामुळे केंव्हा, कुठला व कशासाठी निर्णय घ्यायचा हे तपासूनच पुढील काम आपणा सर्वांना करावयाचे आहे. ''**सहकाराची ही चळवळ सरकारची नसून सरकारच्या सहकार्याने सहकार यशस्वी करावयाचा हा मुलमंत्र सहकार महर्षि व या राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतदादा पाटील सारख्या धुरिनांनी दिल्यामुळेच त्याचे पावित्र्य राखण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे.**'' आणि या महत्त्वाच्या योगदानात आपला प्रतिसाद सातत्याने मिळाल्यामुळे पतसंस्थांसाठी भविष्यकाळ निश्चितपणेअत्यंत उज्वल आहे.आपणा सर्वांना शुभेच्छा!

**जय हिंद! जय महाराष्ट्र !! जय सहकार!!!**